बृहन्मुंबईतील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान युनियन बँक ऑफ इंडिया या बँकेमार्फत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र. वेतन १२१६/प्र.क्र. ३९/१६/टीएनटी-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २८ मार्च, २०१८

संदर्भ :-

१ शालेय शिक्षण शासन निर्णय क्र. एसएसएन -१८६७/७६१४२-जी, दिनांक २९ मे १९७३
२ शासन निर्णय वित्त विभाग क्र. डी.डी.ओ.-१००५/प्र.क्र.५/कोषा-प्रशा-५, दिनांक २९ ऑगस्ट, २००५
३ शासन निर्णय वित्त विभाग क्र.डी.डी.ओ. १००५/प्र.क्र.६२/कोषा-प्रशा-५, दिनांक ७ एप्रिल, २००८
४ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एसएसएन-१००७/(७७/०७)/ माशि-२, दिनांक ५ ऑक्टोबर, २०११
५ शासन निर्णय , शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन-१००७/७७/१२/माशि-२, दिनांक ३ ऑगस्ट, २०१२
६ शासन शुध्दीपत्रक , शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन-१००७/७७/०७/माशि-२, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२
७ शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन-१००७/७७/०७/माशि-२, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२
८ शासनाचा समक्रमांक दिनांक ३ जुन, २०१७ रोजीचा शासन निर्णय
९ शासनाचे समक्रमांक दिनांक ३० जुन, २०१७ रोजीचे शुध्दीपत्रक

प्रस्तावना :-

राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित - विना अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांचे प्रदान मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत करण्याबाबत दिनांक ३ जुन, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. सदर शासन निर्णया विरोधात मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र. २०३९/२०१७ व रिट याचिका क्र. १७५/२०१८ दाखल झाल्या होत्या. सदर याचिकांचा अंतिम निर्णय दिनांक ९.२.२०१८ रोजी झाला असून मा. उच्च न्यायालयाने शासनाचा दिनांक ३.६.२०१७ रोजीचा शासन निर्णय रद्द केला

आहे. तसेच बृहन्मुंबईतील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेमार्फत अदा करण्याबाबत आदेशित केले आहे. मा. उच्च न्यायालयाने आदेशात खालील प्रमाणे नमुद केले आहे,

"The learned Advocate General in the morning session himself submitted that, there was total freedom to the employees and the schools to open their accounts in whichever bank they desired. Learned Advocate Gereral fairly submitted that, though the communication dated १९.०७.२०१७ addressed by Respondent No.५ compels the headmaster of the schools and the teachers to open the account in Respondent No.७ bank, the same is not being implemented. He further stated that even as of now the salaries are being paid to the teachers in their account in the bank of their choice. We find that, even after the GR is quashed and set aside, no change is required to be done in that system. The only change would be the "Pool account", which is being operated by Respondent No.७, would be operated by the Nationalized Bank. त्यामुळे सदर शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन पुर्ववत युनियन बँक ऑफ इंडिया या बँकेमार्फत अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

बृहन्मुंबईतील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन युनियन बँक ऑफ इंडिया मार्फत अदा करण्याबाबत दिनांक ५ ऑक्टोबर, २०११ चा शासन निर्णय रद्द करुन दिनांक ३ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये युनियन बँक ऑफ इंडिया या बँकेऐवजी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत अदा करण्यास मान्यता देण्यात आली होती. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. २०३९/२०१७ व रिट याचिका क्र. १७५/२०१८ मध्ये दिनांक ९.२.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार दिनांक ३ जून, २०१७ चा शासन निर्णय रद्दबातल ठरविला आहे. त्यामुळे आता दिनांक ५ ऑक्टोबर, २०११ चा शासन निर्णय पुन्हा अंमलात आला आहे.

२. त्यानुसार अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (दक्षिण/उत्तर/पश्चिम) यांचे मेन पुल अकाउंट (पार्किंग अकाउंट) युनियन बँकेत तात्काळ उघडण्यात यावे.

३. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ९.२.२०१८ च्या आदेशानुसार संबंधीत शाळा व शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना त्यांचे वैयक्तिक खाते अन्य बँकेत उघडण्याचे स्वातंत्र्य राहील.

४. सदर निर्णयामुळे मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसोबत करण्यात आलेला करारनामा संपुष्टात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१६०२४११८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.03.28 16:04:18 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव
२ आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३ महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
४ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
५ संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६ सह संचालक (सुधारणा), संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७ शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्य), महाराष्ट्र राज्य, पुणे
८ विभागीय शिक्षण उप संचालक, मुंबई विभाग, मुंबई
९ शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई
१० अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
११ अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), मुंबई
१२ सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३ निवड नस्ती, टीएनटी/३, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.